

ई-स्पर्श
वर्ष पहिले. अंक चौथा.
सप्टेंबर २०१२
साहित्य प्रतिष्ठान

# इत्यर्थ : वर्ष पहिले, अंक चौथा.

सप्टेंबर २०१२

संपादक मंडळ

नाम गुम जायेगा : ठाणे महाराष्ट्र.

तनवीर सिद्दीकी : बिलासपुर छत्तीसगढ.

सृजा : औरंगाबाद महाराष्ट्र.

©लेखनाचे सर्व हक्क संबधित लेखकांच्या स्वाधीन.

छायाचित्रे गुगल सर्च वरून घेतली आहेत. त्यांचे हक्क संबंधित चित्रकारांच्या स्वाधीन.

© ई साहित्य प्रतिष्ठान® २०१२

इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यातील मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही

संपर्क : ई साहित्य प्रतिष्ठान

अकरावा मजला (जी ११०२)

ईटर्निटी

ईस्टर्न एक्सप्रेस हायवे

ठाणे. ४००६०४

वेबसाईट: http://www.esahity.com

ईमेल: esahity@gmail.com

मोबाईल: 9869674820

# या अंकात...

भेट दोन प्रोफाईल फोटोंची

एक गोड कथा एका अनपेक्षित भेटीची....

-राहुल अरुणाकिशन रणसुभे

देवकर्म हाच अमुचा धंदा

नाट्यछटा.. दांभिकपणावर ओढलेला एक मिष्किल आसूड.

- श्रीपाद कुलकर्णी

A Letter From A Girl To JRD Tata

(अनुवाद)

एका असामान्य लेखणीतून उमटलेले उत्तुंग व्यक्तिमत्वाबद्दलचे अनुभव

मूळ लेखन: सुधा मूर्ती

अनुवाद: अमित डांगे

बूटपॉलीश

रोजच्या आयुष्यातच पण न दिसणाऱ्या कलंदर बाजूची झलक.

-विशाल कुलकर्णी

सेकण्डहॅण्ड

आशेच्या मनोऱ्यांवर नियतीची मर्जी.

-तनवीर सिद्दिकी

# संपादकीय

अनेकदा असं होतं की लिहावं लिहावं म्हणून अनेक विषयांची यादी मी डोक्यात तयार ठेवते. रुपरेषा आपोआप तयार होतात. काही ठेवणीतली वाक्यं, काही वाक्प्रचार त्या त्या विषयानुरूप सुचतात त्यांनाही एका यादीत टाकलं जातं.. आणि मग मी कधीतरी लिहायला बसते.

कॉम्प्युटरसमोर (मी नव्या पिढीची ना.. पेन-कागद घेऊन लिहिणं मला जमत नाही. विचार फक्त कॉम्प्युटरसमोरच शब्दरूप घेतात) बसले की मग मात्र काहीतरी आगळंच घडायला लागतं. सगळ्या याद्या, रूपरेषा, वाक्प्रचार आपोआपच जातात विस्मृतीत आणि उमटू लागतात ती प्रतिबिंबं. त्या क्षणाच्या विचाराची. काही ठरवून लिहून काढणं आजवर जमलेलंच नाही. त्यामुळे, स्तंभलेखक, भाषण लिहून देणारे, गरजेनुसार लिखाण करणारे या लोकांबद्दल माझ्या मनात प्रचंड आदराची भावना आहे. माझ्या तुलनेत हे लोक नेहमी सर्वश्रेष्ठ आहेत आणि राहतील असं मला वाटतं.

म्हणूनच कदाचित लिहिणं हा माझ्यासाठी एक आत्मानुभव असतो. मीच लिहिलेल्या कविता, मीच लिहिलेले लेख मी काही महिन्यांनी उघडून पाहते तेव्हा मला एक अलिबाबाची गुहा सापडल्यासारखं वाटतं. कारण लिहिण्यासोबतच माझं वाचनही समयसापेक्ष झालं आहे. आणि जुन्या शब्दांना नवे संदर्भ जोडण्याची सवयही जडली आहे. म्हणून मग माझेच शब्द नवे नवेसे वाटतात.

इत्यर्थचा दर महिन्याचा अंक तयार करतानाही अशाच अनुभवातून जायचं असतं. दर महिन्याला आमच्याकडे येणाऱ्या लेखनातून निवड करताना कित्येक आरसे असलेल्या खोलीत असल्यासारखं वाटत राहतं. माझे विचार, लेखकाचे विचार आणि वाचकांचे विचार अशा अनेक कोनांमधून हे लेखन दिसतं आणि उमजतं. माझ्या मते इत्यर्थचा हाच भाग माझ्यासाठी सर्वात महत्वाचा आहे.

या महिन्याचा इत्यर्थ मला सतत अंतर्मुख करत होता. माझ्या आजूबाजूला काय काय सुरू आहे आणि हे सारं माझ्या मनाचे कुठकुठले कंगोरे छेडतंय हेही एक गूढ असल्यासारखं..

खात्री आहे की हाही अंक रसिक वाचक आपला मानून घेतील..

सृजा

mesruja@gmail.com

संपादक मंडळ:

नाम गुम जायेगा: naamagumjaayegaa@gmail.com

तनवीर सिद्दिकी: siddiqui.tanveer9@gmail.com

सृजा : mesruja@gmail.com

सव्वा लाखाच्यावर ऑनलाईन वाचकवर्गाच्या सेवेत ५ वर्षांपासून अविरत.

२५० दर्जेदार ई- पुस्तके.

संपर्क:

esahity@gmail.com

etyarth.esahity@gmail.com

# भेट ! दोन प्रोफाईल फोटोंची...

राहुल अरुणाकिशन रणसुभे

तो पुण्यामध्ये एका वृत्तपत्रामध्ये उपसंपादक.

ती मुंबईमध्ये बी.कॉमचे शिक्षण घेणारी.

दोघेही अनोळखी. एकमेकांचा जराही सुध्दा गंध नाही, की पुसटशी ओळखही नाही.

त्याला वेड होते ते फेसबूकवरुन नवनवीन मित्र-मैत्रीण जोडण्याचे.

तिला आवड होती नवीन पुस्तके, लेख वाचण्याची. नवनवीन लोकांशी ओळख वाढवण्याची.

तो आपला मुक्तछंदी, मन मिळाऊ, कलाकार मनोवृत्तीचा.

ती ही सुध्दा तशीच मुक्तछंदी, स्वतःचे विश्व निर्माण करु पाहणारी, २१ व्या शतकातील तरुणी.

हा कधी-मधी पुरवण्यांमध्ये लेख लिहायचा आणि फेसबूकवर शेअर करायचा.

ती नियमीतपणे याच्या प्रत्येक लेखाला लाईक करायची.

काही दिवसानंतर याच्या लक्षात आले की, कोणीतरी आपल्या लेखांना नियमितपणे लाईक करत आहे.

एकदा त्याने असेच ऑफलाईन चॅट करण्यास सुरुवात केली. मग तिकडूनही रिप्लाय आला.

याच्या मनात लाडूच फुटले.

तिही याच्याशी छान गप्पा मारू लागली.

२-२ तास चॅटींग चालायची. खूप बोलायचे दोघे. मस्त जमलं होतं दोघांचं ट्यूनिंग.

हळू-हळू बोलणं चॅटींग इतकं वाढलं, की १० मि. सुध्दा ऑफलाईन राहणं अवघड झाले.

जेवणाकडे लक्ष नाही की, तब्येतीकडे. सारं लक्ष फेसबुककडे.

ती मोबाईलवरुन फेसबूक हाताळायची तर हा ऑफिसमधून वेळ काढून बोलायचा.

ऑफिस संपलं की, दोघांच्या बोलण्याला विराम यायचा.

यावर शक्कल काढून दोघांनी एकमेकांचे मोबाईल नंबर घेतले.

मग काय पहिले चँटींग आणि मग सुरु झाल्या मोबाईलवरच्या गप्पा.

पण मोबाईलसुध्दा कुठे पुरतोय त्यांच्या बोलण्याला. मोबाईलचे बील वाढत होते. बॅलन्स धडाधड कमी होत होते. नुसते रिचार्ज आणि मोठमोठी बीलं भरणं यातचं सर्व पैसा खर्च होत होता.

यावर उपाय म्हणून याने एका दूस-या कंपनीचे सिमकार्ड घेतले आणि तेच कार्ड तिलाही घ्यायला लावले.

यामुळे दोघांना अगदी कमी पैशात तासभर बोलता येत होते.

आता यांच्या बोलण्याला रात्र सुध्दा कमी पडू लागली.

ती घरी असायची आणि हा रुम करुन राहत होता. तिला तिची आई ओरडायची आणि हा मस्त तिच्याशी गप्पा मारायचा.

तिलाही खूप बोलावंस वाटायचं पण आईच्या रागावण्याने मध्येच तिला बोलणं बंद कराव लागायचं.

एक दिवसं तिने सकाळीच फोन केला. हा मस्त झोपलेला.

गडबडीत त्याने फोन उचलला.

ती फार वैतागली होती. खूप काही काही बडबडत होती.

हा तिला समजावत होता. काय झालं विचारत होता.

ती काहीच बोलेनाशी झाली. आणि मग ती हळूच रडत रडत म्हणाली... आय लव्ह यू... मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही.

याची झोप उडाली. याला काही कळेनासे झाले. एकमेकांना यांनी अजून पाहिले नव्हते. तोंडओळख ती सुध्दा फेसबूकवरील प्रोफाईल फोटोची. बस.. एवढेच त्यांनी एकमेकांना पाहिलेले.

हा तिला समजावत होता. आपण २१ व्या शतकातले, असे एकमेकांना न पाहता कसे एकदम लग्नाबाबत ठरवायचे.

तू मला पाहिले नाही, की मी तुला!.

मलाही तू आवडतेसं पण इतका पुढचा विचार मी केला नाही.

पहिले आपण भेटूयात मग काय तो निर्णय घेऊयात.

आता या निर्णयावर त्यांची गाडी पोहचली.

पुन्हा बोलणे सुरु झाले. पण आता दोघांत ओढ होती ती म्हणजे भेटीची.

अनेक तारखांच्या बदलानंतर एक तारीख ठरली  फेब्रुवारीची.

व्हेलेंटाईन डे ला भेटायचे होते पण तेही जमणार नसल्याने मग त्याआधीची भेट ठरली.

ह्याची भेटण्याची तयारी सुरु झाली आणि तिची सुध्दा.

कसं भेटावं? काय बोलाव? ती कशी असेल? तो कसा दिसत असेल? ती काळी की गोरी? हा उंच की बुटका?

अशा अनेक प्रश्नांनी दोघांच्या मनात घरं करण्यास सुरुवात केली.

मग यांनी भेटण्याआधीच ठरवल, की भेटल्यावर जर आपण एकमेकांना आवडलो नाही तर तसं स्पष्ट सांगायचं. कोणीच कोणाला चुकीचे ठरवणार नाही. तसेच कोणीच कोणावर रागावणार नाही.

हा मुलगा मुलगी बघण्याचा कार्यक्रम यांनीच ठरवला. वेळ ठरली, स्थळ ठरले.

सकाळी ६ च्या सिंहगड एक्सप्रेसने हा मुंबईला निघाला. सीएसटीला भेटण्याचे ठरले.

याचे स्वप्न होते की, एकदा तरी मरीन ड्राईव्हला जायचं. तिथे एक संध्याकाळ काढायची.

मग तिथेच भेटायचे ठरले. दोघेही मस्त तयार होऊन सीएसटीवर पोहोचले. तिथल्या गर्दी गोंगाटात एकमेकांना शोधू लागले.

इकडे शोध तिकडे शोध चालू झाला. फोन न करण्याचे ठरवले होते त्यांनी.

आता बोलायचे ते समोरासमोरच.. असंच त्यांनी ठरवलं होतं.

एकमेकांना दोघांनीही पाहिलेलं नव्हत आतापर्यंत.

ओळख फक्त फेसबूकवरच्या त्या प्रोफाईल फोटोंचीच.

इकडे तिकडे शोधत शोधतं ते एकमेकांसमोर येऊन उभे राहिले.

दोघेही एकदंम स्तब्ध.

कसलाच आवाज नाही की, कसलीच गडबड नाही. जणू त्यांच्यासाठी सीएसटी म्हणजे एका निरवं ठिकाणासारखं झाले होते.

तिने पटकन येऊन याला मिठी मारली. जगाचे, लोकांचे कसलेच भान आता उरले नव्हते. आसं होती ती फक्त एका भेटीची. त्या एका उबदार मिठीची. तो ही गहीवरुन आला. कसंबसं सावरत दोघे गप्पा मारत मारत मरीन ड्राईव्हच्या दिशेने निघाले.

दोघांनी एकमेकांना पहिल्यांदाच पाहिले होते. त्यांची जोडी काही हिरो -हिरॉईन सारखी नव्हती.

तो खूप हॅण्डसम आणि ती खूप ब्यूटीफूल असं ही काही समिकरण नव्हतं पण दोघांचा स्वभाव तिळमात्र वेगळा नव्हता.

दोघेही आपल्या विश्वात रमणारे, आपली स्वप्न जोपासणारे, आपलं स्वतःचं एक वेगळं विश्व निर्माण करणारे, उंच-उंच भरारी मारण्याची स्वप्नं पाहणारे हे दोन पक्षी आज पहिल्यांदा एकत्र आले होते.

जणू त्यांना असं वाटतं होतं, की देवाने आपल्या दोघांना एकमेकांसाठीच बनवले आहे.

ते दोघे होते ही तसेच. एकदम वेगळे.

दोघांना जशा आपल्या जोडीदाराबद्दल अपेक्षा होती, तशीच ती दोघं होती. दोघांनाही काडी मात्र रागाची झालंर नव्हती.

दोघं मस्त मजेत इकडे तिकडे फिरत होते. मुंबईच्या त्या आफाट गर्दीच्या व रहदारीच्या रस्त्यावर हातात हात घालून मोकळेपणाने भटकत होते.

एकमेकांचा हात त्यांच्या हातून सुटत नव्हता. याला मुंबईची फार आवड होती त्यामुळे तो भलताच खूष होता. तीला तो भेटला त्यामुळे तिचा आनंदालाही पारावार नव्हता.

जसजशी संध्याकाळ होत होती तशी यांची पाऊले मरीन ड्राईव्हकडे वळू लागली.

मस्त सूर्यास्ताच्या वेळी यांनी मरीनड्राईव्ह गाठलं.

निवांत एका ठिकाणी त्यांनी एक जागा निवडली.

समुद्राच्या लाटा, सुर्यास्ताचा मंद प्रकाश व दूरवर समुद्राच्या पाठीमागे लपणारा तो सुर्य आणि त्याला न्याहळत एकमेकांचे हात हातात घेऊन बसलेली ही दोन पाखंर.

आता त्यांना कशाचीच चिंता नव्हती. ना जगाची, लोकांची, की घरच्यांची. हा दिवसं संपूच नये असं त्यांना वाटत होतं.

संध्याकाळ हळू-हळू संपायला लागली आणि रात्रीचा अंधार सर्वत्र पसरू लागला. समुद्राच्या त्या टोकाला सुर्यानेही आता विश्राम घेतला. थोडं निळसर, थोडं तांबड्या रंगाच्या आभाळाचे प्रतिबिंब दिसणा-या त्या लाटा घेऊन पायापाशी धडकतं होत्या.

अंधाराची चाहूल लागताचं तिची घरी जायची लगबग सुरु झाली. हा मात्र तिला अजून थोडं थांब म्हणून विनवणी करत होता. तिच मन होत नव्हतं घरी जाण्याचं परंतु आईचा सारखा सारखा फोन येत होता.

जड पावलाने दोघांनी एकमेकांचा निरोप घ्यायचं ठरवलं. पुन्हा एकदा घट्ट मिठी मारुन एकमेकांना एका सुंदर आठवणीत अडकवलं.

दोघांनाही एकमेकांचा सहवास आवडला.

दोघेही एकमेकांना आवडू लागले.

दोघे ही प्रगल्भ विचारांचे. दोघांमध्ये अडचण होती ती म्हणजे-

दोघांच्या जातींची. त्यातचं हा मुळचा छोट्या शहरातला आणि ती मात्र मुंबईची.

तिला मुंबईतच रहायचं होत. पण याला मुंबई परवडणारी नव्हती.

त्यातच नुकतेच शिक्षण संपून तो नोकरी करत होता.

आणि तिचे शिक्षण अजून बाकी होते.

तरीही दोघांनी ठरवलं, की आपणं एकमेकांवर प्रेम करतो हेच आपल्यासाठी खूप महत्वाचे आहे.

ते दोघे खूप पुढच्या विचारांचे होते.

दोघांनी ठरवंल की, एकमेकांवर जबरदस्ती करायची नाही.

तू माझ्याशी लग्न करचं असं कधीच म्हणायचं नाही.

दोघांच्या घरची मान्यता असेल तरच लग्न करुयात. नाही तर एकमेकांपासून आपण दूर होऊयात.

आपलं एकमेकांवर जीवापाड प्रेम आहे यातचं आपलं सर्वस्व आहे. एकमेकांवर रागावून संशय घेऊन दूर होण्यापेक्षा एकमेकांच्या सुंदर आठवणी आपण विलग होऊयात असं तिने ठरवलं.

दोघांची स्वप्न एकसारंखी.

दोघांनाही पूर्ण करायची होती त्यांची स्वप्न.

दोघांनाही गाठायची होती त्यांचे ध्येय.

मग दोघांनी आणखीन एक निर्णय घेतला.जर आपण एकमेकांच्या स्वप्नांच्या आड येऊ लागलो तर आपण स्वप्न पूर्ण करुयात. एकमेकांना सोडण्याची वेळ आली तर ते ही करुयात.

या निर्णयासोबतचं त्यांच्या पहिल्या भेटीचा दिवस संपला. मग पुन्हा दोघे हातात हात घेऊन सीएसटीकडे निघाले.जसे आले होते तसेच... फक्त यात बदल म्हणजे येताना दोघांच्या चेह-यावर एक वेगळा आनंद होता. तो म्हणजे भेटण्याचा...

परंतु आता मात्र दोघांच्या डोळयात पाणी होते..

ते म्हणजे विरहाचे...वेगळे होण्याचे....

तसेच पुढच्या भेटीच्या आनंदाचे....

-राहुल अरुणाकिशन रणसुभे

rahulakransubhe@gmail.com

+91 97  62 771 320

# A Letter From A Girl To J R D Tata

## (अनुवाद)

मूळ लेखन: सुधा मूर्ती

अनुवाद: अमित डांगे

बहुधा तो १९७४ चा एप्रिल महिना असावा. आता बँगलोरही तापायला सुरूवात झाली होती. आय. आय. एस. सी. कँपसमधील गुलमोहर फुलला होता. आमच्या पदव्युत्तर विभागामध्ये मी एकटीच मुलगी होते. आणि मी मुलींच्या वसतीगृहात राहत होते. इतर मुली विज्ञान शाखेच्या विविध विभागांमध्ये संशोधन करीत होत्या. मला कॉम्प्युटर सायन्समध्ये डॉक्टरेट मिळविण्यासाठी परदेशी जायचे होते. अमेरिकेतील विद्यापिठांकडून मला शिष्यवृत्ती देण्यात आली होती. भारतामध्येच नोकरी करण्याचा विचारही मनात नव्हता.

एके दिवशी लेक्चर हॉलच्या इमारतीतून माझ्या हॉस्टेलकडे जाताना नोटीस बोर्डवर मी एक जाहीरात बघितली. ती दर्जेदार नोकरीबाबतची सूचना सुप्रसिद्ध टेल्कोची (टाटा मोटर्स) होती. त्या जाहिरातीनुसार कंपनीला, तरूण, हुशार, कष्टाळू आणि उत्तम शैक्षणीक गुणवत्ता असलेले अभियंते हवे होते. मात्र सगळ्यात शेवटी एक छोटी ओळ होती, "स्त्री उमेदवारांनी अर्ज करू नये". हे वाचून मी नाराज झाले. आयुष्यात पहिल्यांदाच माझा सामना लिंगभेदाशी होता.

जरी मला ती नोकरी करायची नव्हती तरी त्या गोष्टीकडे मी आव्हान म्हणून पाहू लागले होते. माझी शैक्षणीक अर्हता अतिशय चांगली होती, माझ्या बरोबरच्या पुरूष उमेदवारांपेक्षाही चांगली. पण तेव्हाच मला थोडं हेही लक्षात येऊ लागलं होतं की, वास्तव आयुष्यात यशस्वी होण्यासाठी फक्त शैक्षणीक गुणवत्ता पुरेशी नाही.

ती सूचना वाचल्यानंतर मी फणकारतच माझ्या खोलीत गेले. मी ठरवलं होतं की, टेल्कोच्या व्यवस्थापनातील सर्वोच्च व्यक्तीला त्यांच्या कंपनीत होत असलेल्या अन्यायाची जाणीव करून द्यायची. मी एक पोस्टकार्ड घेतलं आणि लिहायला सुरूवात केली. पण एक अडचण होती. मला टेल्कोच्या सर्वोच्च पदी कोण आहे हेच माहीत नव्हतं.

पण मग नक्कीच टाटांपैकीच कोणीतरी असणार असा विचार मी केला. मला जे.आर.डी टाटा, हे टाटा समुहाचे प्रमुख होते हे माहित होते, मी त्यांची छायाचित्रे वर्तमानपत्रात पाहिली

होती.  खरं तर सुमंत मुळगावकर हे कंपनीचे तेव्हाचे अध्यक्ष होते. पण मी पत्र घेतले आणि जे.आर.डींच्या नावे लिहायला सुरूवात केली. आजही मला मी काय लिहिले होते हे स्पष्टपणे आठवतंय, ‘टाटा परिवार भारतीयांसाठी नेहमीच एक अग्रेसर आदर्श आहेत. त्यांनीच भारतात पायाभूत सुविधा पुरविणारे उद्योग सुरू केले. लोखंड आणि पोलाद, रसायन, वस्त्रोद्योग, आणि रेल्वे इंजीन व रूळ ही त्यांचीच देणगी. भारतामध्ये उच्चशिक्षणाची काळजी त्यांनी इ.स. १९०० पासून घेतली आणि इंडीयन इंस्टीट्यूट ऑफ सायन्सच्या स्थापनेतही पुढाकार घेतला. सुदैवाने मी तिथे शिकत आहे. पण मला आश्चर्य वाटतं की टेल्कोसारखी कंपनी लिंगानुसार भेदभाव कसा करू शकते ?’

मी ते पत्र पाठवले आणि नंतर त्याबद्दल विसरूनही गेले. त्यानंतर १० दिवसाच्या आत मला टेल्कोच्या पुणे येथील कंपनीमध्ये कंपनीच्या खर्चासहीत मुलाखतीसाठी हजर राहण्याबाबतची तार मिळाली. त्या तारेने मला आश्चर्यचकीत केले. मला माझ्या वसतीगृहातील मैत्रिणी म्हणाल्या की पुण्याला फुकट जाण्याची संधी मी नक्कीच घ्यावी व पुण्याच्या प्रसिद्ध साड्या स्वस्तात विकत आणाव्या! मी ज्यांना साडी हवी त्या प्रत्येकीकडून रू. ३० गोळा केले. जेव्हा मी मागे वळून बघते तेव्हा माझी पुण्याला जाण्याची कारणे हास्यास्पद वाटतात.

पुण्याला दिलेली ही माझी पहिलीच भेट होती. आणि मी लगेचच पुण्याच्या प्रेमात पडले. आजही तो दिवस माझ्यासाठी जवळचा आहे. आज मला जितकं माझं शहर, हुबळी आपलं वाटतं, तितकंच पुणेही मला आपलं वाटतं.

मला सांगितल्यानुसार मी मुलाखतीसाठी पिंपरीच्या टेल्कोच्या ऑफिसमध्ये पोहचले. त्या पॅनेलवर सहा लोक बघीतल्यावर मुलाखतीचं गांभीर्य माझ्या लक्षात आलं.

मी त्या खोलीत प्रवेश करत असतानाच, ‘हीच ती मुलगी जिने जे.आर.डींना पत्र लिहिले’ असे कुणीतरी कुजबुजल्याचे मी ऐकले. त्यावेळेस खरे तर मी शांत होते. अगदी मुलाखत सुरू होण्यापूर्वी मला वाटले की पॅनेल पूर्वग्रहदुषित होता. म्हणून मी जवळ जवळ उद्धटपणेच त्यांना सांगितले की, ’मला आशा आहे की, ही फक्त तांत्रिक मुलाखत असेल’.

त्यांना माझ्या अशा उद्धट बोलण्याचे आश्चर्य वाटले. आणि अगदी आजही मला माझ्या वर्तणुकीची लाज वाटते.

पॅनेलने मला तांत्रिक प्रश्न विचारले आणि मी त्या सर्वांची उत्तरे दिली.

त्यानंतर प्रेमळ आवाजात एक वयस्कर गृहस्थ मला म्हणाले, 'स्त्री उमेदवारांनी अर्ज करू नये, असे आम्ही का म्हणालो हे तुला माहिती आहे का? कारण, कंपनीच्या शॉप फ्लोअरला आम्ही कधीही महिलांची नेमणूक केलेली नाही. ही फॅक्टरी आहे, कॉलेज नाही, जेव्हा शैक्षणीक गुणवत्तेचा विषय येतो, तेव्हा तू कायमच प्रथम श्रेणी मिळवली आहेस. आम्ही त्याचे कौतुक करतो, पण तुझ्यासारख्या लोकांनी संशोधन केले पाहिजे'.

मी हुबळीसारख्या छोट्या शहरातली मुलगी होते. माझं जगही मर्यादीत होतं मला मोठ्या कंपन्यांची कामाची पद्धत व त्यांच्या अडचणी  माहिती नव्हत्या, त्यामुळे मी उत्तर दिले की, 'पण तुम्ही कुठे ना कुठे सुरूवात तर केलीच पाहिजे, नाहीतर तुमच्या फॅक्टरीमध्ये महिला कधीही काम करू शकणार नाहीत'.

शेवटी, दीर्घ मुलाखतीनंतर मला सांगण्यात आले की, मी यशस्वी झाले आहे. बहुधा, हेच माझं प्राक्तन असावं.

मी पुण्यामध्ये नोकरी करेन असा विचारही मी कधी केला नव्हता. पण तिथेच मी एका कर्नाटकातून आलेल्या लाजाळू मुलाला भेटले, आम्ही चांगले मित्र बनलो आणि आमचे लग्नही झाले.

टेल्कोमध्ये रूजू झाल्यानंतरच मला जे.आर.डी कोण आहेत याची जाणीव झाली. “भारतीय उद्योगविश्वाचा अनभिषीक्त राजा!” आता मात्र मी घाबरले होते. पण मुंबईला बदली होईपर्यंत जे.आर.डींना भेटण्याचा योग आला नव्हता. एके दिवशी आमचे अध्यक्ष, मि. मुळगावकर, ज्यांना आम्ही सगळे एस.एम. म्हणून ओळखत होतो, मला त्यांना काही रिपोर्टस दाखवायचे होते. मी बॉम्बे हाऊस (टाटा मुख्यालया) च्या पहिल्या मजल्यावरील ऑफिसमध्ये होते, तेव्हाच अचानक जे.आर.डी आत आले. त्यावेळेस पहिल्यांदा मी 'आप्रो जे.आर.डी' ना पाहिले. गुजराथीमध्ये 'आप्रो' म्हणजे 'आपले'! याच प्रेमळ नावाने बॉम्बे हाऊसमधील लोक त्यांना बोलावत असत. मला माझ्या पत्राचा उद्योग आठवून खूप अस्वस्थ वाटत होतं. एस.एम नी माझी चांगली ओळख करून दिली. 'जे, (याच नावाने त्यांचे अतिशय जवळचे सहकारी त्यांना बोलवत असत) ही मुलगी इंजीनिअर आहे आणि पदव्युत्तरही. ती टेल्कोच्या शॉप फ्लोअरला काम करणारी पहिली स्त्री आहे'. जे.आर.डींनी माझ्याकडे पाहिले. मी मात्र मनोमन प्रार्थना करत होते की, त्यांनी मला माझ्या मुलाखतीबद्दल (किंवा त्या मी पाठवलेल्या पत्राबद्दल) काहीही विचारू नये आणि त्यांनी विचारलेही नाही. उलट ते म्हणाले, 'आपल्या देशात मुली इंजीनिअरींगमध्ये येत आहेत ही चांगली गोष्ट आहे. बरं तुझं नाव काय आहे?' 'सर, मी जेव्हा टेल्कोमध्ये रूजू झाले तेव्हा सुधा कुलकर्णी होते आता मी सुधा मुर्ती आहे' मी म्हणाले. ते हसले आणि एस.एम. सोबत चर्चा सुरू केली. आणि मी मात्र त्या खोलीतून जवळपास पळच

काढला.

त्यानंतर मी जे.आर.डींना बऱ्याचदा बघीतले. ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि मी साधीशी इंजीनिअर होते. आमच्या मध्ये समान असं काहीच नव्हतं. पण मला त्यांचा आदर वाटत होता.

एके दिवशी ऑफिसनंतर माझे पती, मूर्ती, मला न्यायला येण्याची वाट पाहत होते. त्यावेळी जे.आर.डींना माझ्या शेजारी उभे पाहिल्यानंतर मला आश्चर्य वाटले. मला कळत नव्हते की मी काय करू? पुन्हा एकदा पत्राचा उद्योग आठवून मला काळजी वाटू लागली. मागे वळून पाहता मला जाणवले की, जे.आर.डी ते सगळे विसरले होते. त्यांच्यासाठी तो छोटासा प्रसंग असावा, पण माझ्यासाठी नव्हे.

त्यांनी विचारले, 'मुली तू इथे का थांबली आहेस? ऑफिस टाईम संपलाय.' मी म्हणाले, 'सर, माझे पती मला घ्यायला येतील, त्यांचीच वाट पाहत आहे'. जे.आर.डी म्हणाले, 'अंधार पडत आहे आणि या ठिकाणी कोणीही नाही. तुझे पती येईपर्यंत मी तुझ्यासोबत थांबतो'.

मला मूर्तींची वाट बघण्याची सवय झाली होती, पण माझ्यासोबत जे.आर.डी. थांबले असल्याने अस्वस्थ वाटत राहिलं.

मी बेचैन होते. मी डोळ्याच्या कोपऱ्यातून त्यांच्याकडे पाहिले. त्यांनी साधी पांढरी पॅन्ट आणि शर्ट घातला होता. त्यांचं वय झालं होतं, तरी चेह-यावर अजूनही तेज होतं. तिथे कुठेही मोठेपणाचा गर्व नव्हता. मी विचार करत होते, 'बघा हा माणूस, हा माणूस अध्यक्ष आहे, आपल्या देशातील अतिशय सन्मानीय व्यक्तीमत्व! पण हा माणूस आपल्या एका सामान्य कर्मचाऱ्यासाठी थांबला आहे'.

नंतर मी मूर्तींना बघीतले, आणि पळतच बाहेर गेले. जे.आर.डींनी बोलावले आणि म्हणाले, 'मुली, तुझ्या पतीला सांग की, त्याच्या बायकोला पुन्हा कधीही वाट पहायला लावू नको'.

१९८२ मध्ये मला माझ्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. माझी तिथून जाण्याची इच्छा नव्हती, पण माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता. मी माझी शेवटची कामे उरकून बॉम्बे हाऊसच्या पायऱ्या उतरून खाली येत असताना मी जे.आर.डींना वर येताना पाहिले. ते विचारात गढलेले होते. मला त्यांचा निरोप घ्यायचा होता म्हणून मी थांबले. मला

पाहिल्यानंतर तेही थांबले

अतिशय शांतपणे म्हणाले, ‘ मग ! सौ. कुलकर्णी काय चालू आहे?’ (माझा उल्लेख करण्याची त्यांची ही नेहमीची पद्धत होती). ‘सर, मी टेल्को सोडतीये’. ‘तू कुठे जाणार आहेस?’ त्यांनी विचारले. ‘पुण्याला सर. माझे पती इन्फोसीस नावाची कंपनी सुरू करत आहेत आणि मी पुण्याला राहायला जात आहे’.

‘ओह ! जेव्हा तुम्ही यशस्वी व्हाल तेव्हा तुम्ही काय कराल ?’

‘सर, मला माहिती नाही, आम्ही यशस्वी होऊ किंवा नाही’

‘कधीही कच खाऊन सुरूवात करू नका’, त्यांनी मला सल्ला दिला. ‘नेहमी आत्मविश्वासाने सुरूवात करा. जेव्हा तुम्ही यशस्वी व्हाल तेव्हा समाजाला परत द्या. समाज आपल्याला खूप काही देतो. आपण परस्परभाव जपला पाहिजे. तुम्हाला खूप साऱ्या शुभेच्छा!’

त्यानंतर जे.आर.डी. पायऱ्या चढू लागले. तीच आमची शेवटची भेट होती.

अनेक वर्षानंतर त्याच बॉम्बे हाऊसमध्ये, ज्या खुर्चीवर जे.आर.डी. बसत त्याच खुर्चीमध्ये बसलेल्या रतन टाटांना मी भेटले. मी त्यांना टेल्कोमध्ये काम करत असतानाच्या माझ्या गोड आठवणी सांगितल्या. त्यानंतर त्यांनी मला लिहिले, ‘जें बद्दल तुमच्याकडून ऐकून चांगले वाटले, पण तुम्हाला भेटण्यासाठी ते या जगात नाहीत ही खरोखर वाईट गोष्ट आहे.’

मी जे.आर.डींना महान व्यक्ती मानते. कारण, एक व्यस्त व्यक्ती असूनही त्यांनी एका मुलीने न्याय मिळावा म्हणून लिहिलेल्या पत्राची दखल घेतली. त्यांना रोज हजारो पत्रे येत असतील. ते माझं पत्र फेकूनही देवू शकत होते. पण त्यांनी तसे केले नाही. त्यांनी एका अनोळखी मुलीच्या हेतूचा आदर केला. जिच्याकडे ना प्रभावी व्यक्तीमत्व होते ना पैसे, पण त्यांनी तिला स्वतःच्या कंपनीमध्ये संधी दिली. त्यांनी तिला फक्त कामच दिलं नाही तर, तिचं आयुष्य आणि विचारसरणी कायमची बदलली.

आज इंजीनिअरींग कॉलेजमध्ये जवळपास ५०% मुली आहेत. आणि अनेक उद्योगांच्या विविध विभागांमध्ये शॉप फ्लोअरला स्त्रिया आहेत. जेव्हा मी हे बदल बघते तेव्हा मला जे. आर. डी. आठवतात. जर कधी वेळ थांबला आणि त्याने मला विचारले की, मला आयुष्याकडून काय पाहिजे? तर मी एक इच्छा मागेन, आमच्या कंपनीने केलेली प्रगती पाहण्यासाठी जे.आर.डी. परत येऊ देत. त्यांना हे मनापासून आवडले असते.

माझे टाटा मुख्यालयाविषयीचे प्रेम आणि आदर कायम अबाधीत राहील. मी कायमच जे.आर.डींचा अदार करते आणि करत राहीन. मी कायमच त्यांना त्यांच्या साधेपणासाठी, त्यांच्या औदार्यासाठी, माणुसकीसाठी, आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाची त्यांनी घेतलेल्या काळजीसाठी, आदर्श मानत आले आहे.

ते निळे डोळे कायमच मला आकाशाची आठवण करून देतात, त्यात तीच विशालता आणि भव्यता होती.


मूळ लेखिका: सुधा मूर्ती

अनुवाद: अमित डांगे

dangeamit@gmail.com

+91 97 6659 5250


(सुधा मुर्ती या सुप्रसिद्ध लेखिका आणि अनेक सामाजीक विकासकामांच्या उपक्रमात समावेश असणा-या ईन्फोसीस या संस्थेच्या अध्यक्षा आहेत.(होत्या). ईन्फोसीसचे अध्यक्ष (माजी) नारायण मुर्ती हे त्यांचे पती आहेत.)

लेखाचा स्त्रोत : लास्टींग लिजेन्सीज (Tata review - special commemorative issue 2004 ) हा अंक हाऊस ऑफ टाटा यांच्या तर्फे जे.आर.डी यांच्या जन्मशताब्दीच्या स्मृतीप्रित्यर्थ जुलै २९, २००४ रोजी काढण्यात आला.

# "देवकर्म हा अमुचा धंदा"

श्रीपाद कुलकर्णी

नमस्कार मंडळी. काय? मला नाही ओळखलं म्हणता? मी कोण म्हणुनी काय पुसता? अंहं. असं मी अजिबात म्हणणार नाही. अहो, मी एक सामान्य मराठी माणूस, मराठी साहित्याचा चाहता वाचक हीच माझी ओळख. मराठी साहित्यप्रकारात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या आगळया माणसाबद्दल, दिवाकरांबद्द्ल ऐकलं असेलच तुम्ही. बरोब्बर, नाट्यछटाकार दिवाकर, मूळ नाव शंकर काशिनाथ गर्गे!

तर त्यांच्या नाट्यछटांनी प्रभावित झालेला मी. १९८१ साली माझी वयोवृद्ध आजी, देवाघरी गेली. आता तिचा काय संबंध? अहो, जरा धीर धरा. असे मुद्यावर येऊ नका. मी मुद्यावरच येतोय, तर तिचे दिवस करायला वडिलांबरोबर गेलो. त्यावेळेला मी होतो वीसेक वर्षांचा. तर तिचे दिवस केले कृष्णानदीकाठी दत्तगुरुंच्या सान्निध्यात एका गुरुजींच्या घरी जाऊनच. त्यांचं बोलणं आणि वागणं माझ्या मनावर इतकं छाप पाडून गेलं की थोड्याच दिवसांनी माझं मन आणि लेखणी फुरफुरू लागले. मग काय विचारता! दिवाकरांच्या नुकत्याच वाचनात आलेल्या काही नाट्यछटांचा प्रभाव होताच मजवर. लिहिता झालो सरळ नाट्यछटा.

तर सादर करत आहे.... हां हां पण एक मेहेरबानी करा मित्रहो, लक्षात असूदे की हा संदर्भ आहे ३० वर्षांपुर्वीचा आणि भाषा आहे एका देवकर्म करणाऱ्या ब्राह्मण भटजींची. तेव्हा माझ्या पदरचं शक्यतो काही न घालता, कोणाही जाती-गोताचा अवमान करण्याचा उद्देश न ठेवता केवळ व्यवसायाभिमुख प्रवृत्तीतून उलगडलेल्या संवादाचा हा वाग्विलास आहे हे ध्यानात घ्यावं म्हणजे झालं. कारण नाट्यछटेचं शीर्षकच बोलणाऱ्याचा रोखठोक बाज दाखवतं ना..!

# "देवकर्म हा अमुचा धंदा"

"काय म्हणतोस धोंडिबा? सत्यनारायण? अरे बाबा, इथं आज एक मर्तिक चाललंय अन् दुपारी दोन लग्न लावायचीत. त्यात तुझा सत्यनारायण घालायचा म्हणतोस? मी आहे का मोक़ळा? काय? म्हातारीला अन बायकापोरांना घेऊन तंगडतोड करत, अरे कबूल, आलास तसा लाख; पण इथं माझ्या या जागेत कोण रेलचेल अन त्यात तू सोड तुझी मेल! काय म्हणतोस? मोठ्या आशेनं? बरं बाबा, आता ठाणच मांडून बसलास भटजीच्या दारात, माघारी घालवता येत नाही. अरे पंडित, पोथी म्हणतोस का सत्यनारायणाची? काय हो म्हणालास? हं, धॉंडिबा, हातपाय धुवून ये जा! बायकोचे पण..? वा रे वा.. माजघरात तिचे पाय दाबूनही देत असशील, आज धुवून दे. हा$ हा$ हा$!"

बघा, दादासाहेब, या धंद्यात एकदा माणूस गुंतला की आवळलाच जातो. सीझनचे दिवस, प्रत्येकजण ओळखीचा, जो तो आपला जाता जाता देवकर्मासाठी वळतो तो माझ्याच दारात, गावचे इतर ब्राह्मण मेल्यासारखा! काय धॉंडिबा, हात पाय धुवून आलास, पण गडबडीत गडबड करून आलास, कनवटीला पन्नास एक रुपये तरी आहेत नं भटजीला द्यायला? जा बस पूजेला. काय म्हणता दादासाहेब, मर्तिकाचं? छे हो इतर कोणी गावात घेत नाहीत सध्या मर्तिकाचं. मग काय तर! लग्न, मुंज, मर्तिक सगळयाचं संमेलन एकट्या माझ्याकडंच पाहायला मिळेल.

आता का! अहो इतरांकडे जातोय कोण? अहो, म्हणू नये पण स्टेशनवर टांगेवाले हाळी घालतात तसं विचारायला पुढं पुढं करणाऱ्या या उठवळांना भीक घालणार कोण? देवाधर्माची गोष्ट, नीट होईल याची शाश्वती तरी हवी ना! उगा तोंड हलिवलं तर काय समजायचं, देवाला मंत्र घालतोय का शिव्या हासडतोय! कसं बोललात! म्हणूनच मी म्हणतो यामुळं मर्तिकाची मक्तेदारी जवळजवळ माझीच आहे. हा पण म्हणून हयगय नाही बरं! अगदी पद्धतशीर.म्हणजे? अहो, वाटलं पाहिजे लोकांना, आपलेही दिवस इथंच करून घ्यावेत!

काय रखमाबाई, काय गडबड आहे? नोट फाटकी आहे? च्यायला! या मोलकरणी तर अगदी शिरजोर बनल्यात. अगं आण ती इकडं. जरा पाण्यानं चिकटवून चुलीपाशी धग देऊन वाळवली की ताठ होईल मढ्यागत.

काय हो दादासाहेब, मी म्हणतो ते पटतं की नाही तुम्हांला? हं तेच तर, आता आम्ही धंदेवाईक माणसं, स्पष्ट बोलणार काय ते, पण लबाडी नाही. बरं, कापड-साडीची व्यवस्था करून ठेवलीय नं? अहो ऐका दादासाहेब, विधवा का मरेना म्हातारी, पण बाई म्हंटल्यावर साडी चोळी नाही नेसवायची? हे पहा आमचं शास्त्र हे असं आहे. खरंय, तुम्ही एवढी दुःखी माणसं, तुमच्याकडून लोंबाडून झोंबाडून घेणं माणुसकीला शोभेल का? काय म्हणता, त्याचे पैसे वेगळे देताय? हरकत नाही. अग ए ऐकलस का....

हो तर, अख्खं कुटुंब, बायको, मुलगी, मुलगा, सून सगळे कामात असतात सतत, कुणाची कुरबुर नाही. आलेल्या माणसांचं उणंदुणं पाहाणं लागलं आमच्याकडं, ते तिक़डं स्वैंपाकात, आम्ही बैठकीत, मेळ जमावा लागतो. त्रास? डोक्याला कमी का ताप असतो! येणारी माणसं न दुखवता सगळं करायचं, पण एकदा पत्करलंय म्हंटल्यावर. तेच तर म्हणतो ना!

अगं कुसुम, तो आचारी तिकडं काय सांगतोय बघ, न बोंबलता करता येत नाही का काही त्याला? काय रे मध्या, वह्राड आलं पाटलाचं? अरे, मग ती खोली दे नं उघडून अंगणातली, त्याला काय सामोरं जाऊन आरती ओवाळायचीय का? बघत राहिला उभा शुंभासारखा!

त्याचं काय आहे दादासाहेब, तुमच्या ब्राह्मणी लग्नांपेक्षा यांची लग्नं पत्करली, सक़ाळच्याला ट्रॅक्टर ट्रॉली भरून वह्राड येतं, लाडवाचिवड्याच्या कुलुपं ठोकलेल्या पेटाऱ्यांचे एकदोन बापई ठेकेदार इथं आल्यावर खोलून सगळयांना देतात खायला, तंवर नवरा-नवरी देवदर्शन करून येतात तो पंगती बसतात उठतात. काय मुहूर्त असेल त्यावेळेला भटजीनं पाटावर जाऊन बसायचं नवरा नवरीला जमवायचं अन चारदोन मंत्र पुटपुटून हातवारे करायला सांगायचं. काय म्हणता? श्लोक? अहो अगदी रामरक्षा म्हंटली तरी कुणा लेकाला कळतंय? हो तर मंगलाष्टका म्हणायच्या नं घसा खरवडून अन चार ज्वारीचे दाणे बडीवले टाळक्यात की वाजंत्री वाजून वह्राड गेलं सुद्धा! पुढं काय करायचं ते कौतिक करू देत, तकतक नाही आपल्या डोक्याला....

नाहीतर आपली ब्राह्मणी लग्नं... आता का? आदल्या दिवशीपासनं ब्राह्मणाच्या बायका नको नको करुन सोडतात 'गुरुजी, पावडर आहे का? कुंकवाची डबी कुठं आहे? फणी कंगवा

मिळेल का? हे नाही का, ते देता का? आता मला सांगा यांच्या नखऱ्यांना कुठवर पुरायचं आम्ही अन खरं म्हणाल तर यांना कोण येतंय पाहायला? मानपान? ते तर खटलं निराळंच. विहिणीचे पाय धुवायचे, हिचे नाही धुतले, तिचे का नाही धुतले आणि विहिणीला असला चौरंग नको तसलाच हवा बसायला. अरे, ती काय शौचाला जागा बघतीय का बसायला? अहो, कसलं दमानं घ्यायचं, दादासाहेब? काही कळत नाही या लोकांना. काय आहे नं, मला चीड आली की मी स्पष्ट बोलतो....

तुमचं नाही म्हणत मी, पण मर्तिकाचे लोकही वेंधळे हो. आता कसे? अहो, दहाव्याला लवकर चला म्हंटलं घाटावर कार्यक्रमाला तर वेळ लावत बसतात. काय म्हणता? त्यामुळं काय होतं? अहो, कावळयांची येण्याची वेळ १० - साडेदहाची, नंतर कितीही आपटली तरी त्यांची भुकेची वेळ टळल्यावर येणारेत का ते? चूक आपली अन शाप त्या कावळयाला. कावळा शिवला नाही पिंडाला म्हणून. मग तू बोल रे, मी बोलू का रे. काय उपयोग त्याचा! खुळेपणा करतात झालं! आता ती त्यांची वेळ भुकेची कशावरून हे त्या कावळयांनाच विचारायला हवं हा$हा$हा$... म्हणुनच बरंका दादासाहेब, तुम्हां मंडळींना त्यादिवशी घाई केली.....

बरं, तुमची म्हातारी गचकली केव्हा? म्हणजे अमावस्या लागतच होती म्हणा, मग शांत करायला हवी, मधे रिकामा दिवस मिळतोय तेव्हाच. अहो, कुणी सांगितलं शांत लागत नाही म्हणून. कुणातरी सोम्यागोम्यावर विश्वास ठेवायचा असेल तर ठेवा बुवा..पण अरे, माझी काडेपेटी तिक़डं स्वैंपाकघरात नेली कोणी? इथं विडीसाठी लागते पाच पाच मिनिटाला, आणा इकडं. पण दादासाहेब, तुमचे बंधू तर कबूल दिसले शांत करायला, त्यातूनही तुमची मर्जी....

काही म्हणा हं पण दादासाहेब, सुकी ओली सांगावी तितकं स्पष्ट माणूस कळतं मला. माझा रोख नाही समजला म्हणता? म्हणजे आता बघा, तुमच्या बंधूंची मंडळी अन तुमची मंडळी, जमीन अस्मानाचा फरक. तुमची भावजय. चहासारख्या गोष्टीतही फाजीलपणा हो. आता वेळीअवेळी कितीवेळा आम्ही आमच्या उद्योगातून चहा पाजायचा तुम्हांला? चहा-पाण्याचा मामुली खर्च न धरणारा मी, माझाही अगदी नाईलाज आहे आता.

अगं रंभे, आतून चहा आण ना दादासाहेबांसाठी, मला पण ओत बरं. हं आणखी एक कप ओत मला. बघतेस काय? हं तिकडं तुझी आई बोलवतीय बघ, जा पळ. हं काय हणमंतराव

काढलं आज? छे छे! आज मला वेळ नाही आधीच सांगतो. असं असं परवा दिवशी का? बघू या, पण येतांना तयारीनं या म्हणजे झालं, मग झगझग नाही पाहिजे. यादी? हं घ्या यादी लिहून. १० नारळ, डझनभर खारका, २५ सुपाऱ्या, १०० विड्याची पानं, झालंच तर तूप, तांदूळ. किती म्हणून काय विचारताय, एक एक किलो. अरे नाऱ्या काय गडबड आहे? असं असं, त्यांचा अभिषेक केलास का? छान छान....

दादासाहेब, हा आमचा मुलगा यालाही याच धंद्यात घातला मॅट्रीक झाल्यावर. हं मग, माझ्यापेक्षा सवाई आहे बरंका. हं! तुम्हाला बाकीचं काही माहित नाही का, मंडळी, काय आजवर लग्न झाली नाहीत का तुमच्यात. हं मग या परवाच्याला.

तर दादासाहेब, हाही माझ्या खांद्याला खांदा लावून काम करतो, मग काळजी कशाची करावी मी? अरे, इकडं मी लग्न लावतो पाटलाचं. काय, मघा सकाळी कांबळयांची मंडळी बोलावून गेली होती? मग त्यांच्याकडं जा ना तू लग्न लावायला अन विचारलंच तर सांग मी येतोय म्हणून. नाही रे तुम्ही नका थांबू. त्याचं? तूच बोल त्याचं काय बोलायचं ते, मी पडतो त्याचा मैतर; तेव्हा तुच तुझ्या तोंडाला काय येईल ती दक्षिणा माग म्हणजे झालं. काय दादासाहेब, हे आपलं बरं नाही का? अगं कुसुम, माझं पाणी काढ बरं गरम, स्नान उरकून शुचिर्भूत होऊन घेतो, मुहूर्त जवळ येत चाललाय ना! दादासाहेब, तुम्हां मंडळींचंही आटपू द्यात कार्यक्रम भराभर. हो हो, स्नानाला उठतो मी आता. दत्तगुरू!..दत्तगुरू!

श्रीपाद पु. कुलकर्णी

shripadkster@gmail.com

सी २१, सुयोग आदित्य रेसिडेन्सी नं.२,

बिबवेवाडी, पुणे ४११०३७

फोनः २४२१८४२१

# बूटपॉलीश

विशाल कुलकर्णी

"बाबु, सिर्फ दो रुपीया लेगा. एकदम चकाचक पालीस करताय साब. पयले पालीस करवावो.. पसंद आया तो फीर पैसा देव, साब." मी लोकसत्तामधुन डोकं वर काढलं.

'एक तर दोन रुपयात पॉलीश आणि ते सुद्धा, तो आधी पॉलीश करणार... पसंतीस उतरलं तर पैसे द्यायचे.' काही तरी वेगळाच अनुभव होता हा.

मला लगेच बोरीबंदरचे ते तथाकथीत अधिकृत पॉलीशवाले आठवले. त्यांच्या समोरच्या ठोकळ्यावर पाय ठेवले की फटदिशी पहिला प्रश्न येतो, "छुट्टा है ना? बाद में झिगझिग नै मंगताय !" त्या पार्श्वभुमीवर हा सुखद वगैरे म्हणता येइल असाच धक्का होता.

मी पेपर बाजुला ठेवला, त्याच्या कडे नीट पाहीलं. जेमतेम १०-११ वर्षाचं वय. खपाटीला गेलेलं पोट.....

आत्तापर्यंत ट्रेनमध्ये बुटपॉलीश करणारी अनेक पोरं पाहीली होती. कधी सहानुभूती म्हणुन तर कधी स्वस्तात होतंय म्हणुन त्यांच्याकडुन बुटपॉलीश करुनही घेतलं होतं. या पोरांचं दिसणं अगदी सारखं असतं, अगदी एकाला झाका आणि दुसर्‍याला काढा असं. रापलेली कातडी, खपाटीला गेलेलं पोट, तोंडावर कमालीचे तेलकट भाव, केसाला मात्र वर्षानुवर्षे तेलाचा स्पर्श नसतो, तसेच मेणचटलेले कपडे... खांद्यावर ती पॉलीशच्या सामानाची कळकट्ट पिशवी... शक्यतो तोंडात मावा किंवा तत्सम काहीतरी तंबाखुजन्य पदार्थ आणि चेहेर्‍यावर कमालीचे बेरकी भाव. त्याच अपेक्षेने मी त्या आवाजाच्या मालकाकडे पाहीलं..पण इथेच मला आश्चर्याचा पहिला धक्का बसला.

अंगावर साधेच, खरेतर थोडेसे फाटकेच म्हणता येतील असे पण स्वच्छ कपडे. अगदी एरीयलमध्ये नसतील धुतलेले पण स्वच्छ होते. पायात अंगठ्यापाशी शिवलेल्या, त्याला थोड्याशा मोठ्याच होणाऱ्या रबरी स्लीपर. खांद्यावर तशीच एक हिरव्या रंगाची पण धुतलेली एकदोन ठिकाणी ठिगळे मारलेली पिशवी. हातात तो पॉलीशचा लाकडी ठोकळा आणि चेहेऱ्यावर चक्क प्रसन्न हास्य. त्याचा चेहरा पाहिल्यावर त्याला नाही म्हणायची इच्छाच होईना. खरेतर हल्ली मी कधीच बाहेर पॉलीश करत नाही. तेवढीच बचत. असा कोणी मागेच लागला तर मी त्यालाच वर निर्लज्जपणे म्हणतो, "फोकटमे करेंगा क्या? तो बिचारा (मनातल्या मनात का होईना) शिव्या देत निघून जातो. पण आता याच्या निर्मळ चेहऱ्याकडे पाहुन त्याला नको म्हणावेसेच वाटेना.

मी दोन्ही पाय त्याच्यापुढे ठेवले आणि पुन्हा वर्तमानपत्रात डोके घातले. राजेश पवारने पूर्वेला गारद करताना अर्धशतकही झळकावले होते. मनातल्या मनात आपल्या निवडसमितीला शिव्या देत ती बातमी वाचत होतो. बघाना इतके गुणी खेळाडु इथे स्थानिक स्पर्धांमध्ये सडताहेत आणि नाही नाही ते वशील्याचे तट्टु राष्ट्रीय संघात निवडले जातात.

"साबजी....!" पुन्हा समोरुन हाक आली.. "आता काय बाबा !"

"साब, शेवागने कितना बनाया?"

च्यायला, हा पॉलीश करतोय की पेपर वाचतोय. पण त्याचे हात सराईतपणे चालुच होते. आधी त्याने व्यवस्थीतपणे फडक्याने बुट पुसुन घेतले होते. एका ठिकाणी थोडासा चिखल साठुन वाळला होता तो त्याने जवळच्या पत्र्याच्या तुकड्याने हळुवार खरडुन काढला होता. थोडेसे पाणी लावुन ती जागा साफ करुन घेतली आणि आता त्यावर पॉलीशचा हात मारणे चालु होते.

"नही यार, ये वो वाला क्रिकेट नही है, ये तो हमारा दुलीप ट्रॉफीका मॅच है! इसमे सहवाग नही है, सारे रणजी प्लेयर्स है!"

"साबजी, रणजी बोले तो....?"

“अरे यार, रणजी बोले तो..इथे मात्र मी अडकलो कारण हे सगळं हिंदीत त्याला सांगणं म्हणजे आजुबाजुला बसलेल्यांना खुसखुस करायला संधी देण्यासारखं होतं. माझं हिंदी म्हणजे अगदीच धन्य आहे..उदा. “तु चल पुढे, मै तांब्या ठेवके आत्या !”

मी क्षणभर ब्लॉक झालो. त्याला माझी समस्या कळाली की काय कोण जाणे पण त्याचं पुढचं वाक्य चक्क मराठीत होतं. मग मात्र मी त्याला मराठीत सगळं समजावुन सांगीतलं. इंटरनॅशनल क्रिकेट आणि रणजी मॅचेस, दुलीप ट्रॉफी यातला फरक समजावुन सांगीतला.

“या अल्ला, बोलेतो हमारे गल्ली क्रिकेटके माफिक है तो! ऐसाबी होताय क्या साब, वो नसीम खालाका अन्वर है ना, क्या बोलींग करताय साब !! उसको लेगा क्या ये तुम्हारा रणजीवाला ?”

आता मात्र मला राहवेना. मी लोकसत्ता बाजुला ठेवला आणि त्याच्याशी बोलु लागलो.

“नाम क्या है तुम्हारा, किधर रहते हो?”

“पता नै साब, जबसे समज आयी है, सब्बी लोग छोटु कैके बुलाते है, नाम का तो कुच अता पता नै! वईसे तो उल्लासनगर मे रैताय अपुन. वो इस्टेशन के बाजु वाली झोपडपट्टी मे खोली नं. ११३. खोली क्या साब अपने नसीमखाला का झोपडा है, वोईच अपना ठिकाना. कबी कबी लेट हो जाताय तो इदर किदर बी सो जाताय. अब हवालदार आके उठाताय डंडा मारके पन क्या करे, साला अपनी किस्मतच लावारीस है, तो हवलदारको क्या बोलनेका ! ” दुसरा पैर रखो साब… बोलता बोलता त्याचे हात चालुच होते.’

आता मला त्याच्यात स्वारस्य वाटायला लागले होते.

“इसका मतलब पढाई – लिखाईके नामसे तो ठणठण गोपाळच होइंगा”, मी पुन्हा एकदा आपलं हिंदी पाजळलं.

“नै साब, अपुन रात के इस्कुल मे जाताय ना! वो टीचर दीदी है ना उसनेच सिखाया मेरेकु ये सब **साफ सुफ रहनेका बोलके.**” तो थोडासा पुढे झुकला आणि मला पुढे झुकण्याची खूण केली, आजुबाजुची माणसे बघत होती. पण आता मला त्यांची पर्वा नव्हती, मी थोडासा त्याच्याकडे खाली वाकलो.. तो माझ्या कानाशी आला आणि हळुच म्हणाला,”साहब, मेरे

बोलनेपें मत जाना, मै इतनी घटीया जबान नही बोलता. लेकीन क्या करु साफसुथरी हिंदी बोलुंगा तो मुझसे पॉलीश कौन करवायेगा? पेट के लिये करना पडता है साब? लेकीन हा, गंदगी मुझसे बर्दाश्त नही होती!”

त्याक्षणी मात्र मला माझ्या हिंदीची खरंच लाज वाटली. मी मनोमन ठरवलं की याच्याशी फक्त मराठीतून बोलायचं. ती एकच भाषा मी स्वच्छ आणि शुद्ध बोलू शकतो ना!

“किती कमाई होते रे दररोज? तुझ्या खालाला पण पैसे द्यावे लागत असतील तुला, तिच्या कडे राहतोस ना! मग या शिक्षणासाठी कुठुन पैसा आणतोस?”

“अरे साब चाह है उधर राह है, हो जाता है इंतजाम. हौर रैने का बोले तो खाला येक पैसा भी नै लेतीय, उल्टा मै कबी कबी वडापाव लेके जाताय उसके लिये तो गुस्सा करती मेरेपे. अम्माको पैसेका रुबाब दिकाताय क्या करके पुछती उनो !”

आता पॉलीश करून झाले होते. त्याने पिशवीतुन त्याचा तो जरासा रफ असणारा, ऑर्गण्डीच्या कापडासारखा फडका काढला आणि त्याने बुटावर शेवटचा हात मारायला सुरुवात केली.

“साब, अपुनने अपनी अम्मीको नै देखा, खाला बोलती मै उसको पटरीके पास मिला था ! लेकीन मेरेको लगताय की अल्लाकोच मेरे पे तरस आ गया होयेगा जो खाला की नजर पड गयी मेरेपे. अब वोईच मेरी अम्मी है हौर वोइच अब्बा ! कबी कबी कम पडता फ़ीस का पैसा तो खालाईच देतीय ना! हौर एकाद बार उसके पास बी नै हुवा तो टीचरदीदी भर देती है! “

मला उगाचच लाजल्यासारखं झालं. खरतर त्याच्याशी किंवा त्याच्या खालाशी, टीचरदीदीशी माझा काही संबंध नव्हता कधी येण्याची शक्यताही नव्हती. पण उगाचच वाटून गेले की ही खाला काय किंवा ती टीचरदीदी काय ही माणसं कुणाच्या नजरेतही न येता आपापल्या परीने समाजाची सेवा करताहेत आणि आपण मात्र आपल्या बिझी वेळापत्रकाचा बाऊ मिरवून नामानिराळे होतो. किती तोकडे, खुजे असतो ना आपण.

“हो गया साब, देखो कैसा चमक रहा है !” मी एकदम भानावर आलो. पाहीलं तर गाडी बोरीबंदर स्थानकात शिरत होती. मी खिशात हात घातला, पाकीट काढले ..पाहिलं तर

पाकिटात पाच ची एक नोट होती, दहाच्या दोन तीन, पन्नास ची एक आणि काही शंभराच्या नोटा होत्या. मी त्यातली पन्नासची नोट काढली आणि त्याच्यासमोर धरली.

“यार छुट्टे नही है मेरे पास! एक काम करेगा वो बुक स्टॉलपे जा और उसके पास “चंपक” करके एक बच्चोकी किताब मिलती है वो लेके आ. तेरेको छुट्टे दो रुपये मिल जायेगे मेरी किताब भी आ जायेगी. त्याने एकवेळ नोटेकडे पाहीलं. क्षणभर रेंगाळला. पण लगेच त्याने ती नोट घेतली आणि म्हणाला, “यही रुकना साब मै अब्बी आया!”

तो जोरात बुकस्टॉल कडे पळाला. आणि मी त्या जागेवरुन हाललो.तिथून लांब जाऊन व्ही.टी.च्या तिकीट बुकिंग हॉलपाशी एका खांबाआड जाऊन उभा राहीलो. तो थोड्याच वेळात तसाच धावत परत आला. मला त्या जागेवर न पाहून गोंधळला. दोघातिघांना काही तरी खुणा करुन विचारत होता. शेवटी मी सापडत नाही म्हटल्यावर त्याने ते पुस्तक आपल्या पिशवीत टाकलं, हातातल्या चिल्लरपैकी बहुदा दोन रुपये स्वत:च्या खिशात टाकले. बाकीच्या सगळया नोटा तिथेच बसलेल्या आंधळया भिकाऱ्याच्या हातावर टेकवल्या. कपाळावरचा घाम पुसला...आणि..

“ए बुट पालीस....दो रुपीया...दो रुपीया.......!”

मला आयुष्यात पहिल्यांदाच आपल्या कंजूसपणाची लाज वाटली.

**-विशाल कुलकर्णी**

Vishal_Kulkarni@trimble.com

# सेकण्ड हेंन्ड

तनवीर सिद्दिकी

मुंबईची एक साधी-रोजसारखी दुपार. सगळे जण आपापल्या दैनंदिनिंत मग्न. परक्यासारखे... तोच गजबजाट.. गोंधळ.. गर्दी.. असंच काहीतरी.. आणि वर आभाळातून मात्र 'अरुण' देव आग ओकत आपल्या सामर्थ्याची जाग देत रोजप्रमाणे खाली बघून हसत सगळी गंमत पाहत होता..

'इतना खर्चा क्यो आ रहा है भाई?' मी चिंतातूर झालो.

'क्लच वायर खराब है.. ऑईल भी डालना पडेंगा.. टायर घीस गये है..'

माझी मोपेड तेवढ्या विशेषणाला सार्थ नसूनही आणि मी पण घाई गडबडीत असल्याने त्याचे पुराण ऐकणे टाळत असूनही त्याची 'मोपेड' गाथा वाढतच चालली होती आणि त्यासोबत माझ्या घामाच्या धाराही आणि अंत:करणाचा पाराही...

(ती वाट पाहून कंटाळली असेल!!!!) आतून आलेली एक आर्त हाक परत परत गॅरेज मेकॅनिकला ओरडायला भाग पाडत होती..

'अरे और कितना टाइम लगेगा?'

'कम से कम एक घन्टा साहब'

'ठीक है एक काम करो ठीक करके रखो, मे शामको लेके जाता हुं'

'अच्छा साहब. सेकण्ड हॅन्ड गाडी का क्या भरोसा है साहब, पता नही कब धोका दे दे'

शेवटचे वाक्य थोडे झोंबलेच पण याचा हिशोब नंतर 'पूर्ण' करता येईल हा विचार करून मी सटकलो आणि रिक्षाला आवाज दिला.. 'तिला भेटायला!'

ती??

ती!!!! फार जास्त तिच्याविषयी काही सांगण्यावत सध्या तरी नाही. पण एक गोष्ट नक्की की ती आल्यापासून थोडं स्वत:चं 'जगणं' जाणवायला लागलं होतं. थोड्या वर्षांपूर्वी घडलेल्या 'त्या' वादळानंतर पूर्णपणे मृत मनाला तिनेच मैत्रीच्या तुषाराने सिंचित केलं होलं आणि मोकाट अजाण वाटेवर भटकत जाणाऱ्या, समाजाने वाळीत टाकलेल्या या जीवाला नकळत आधार भेटला होता. तशी ओळख झाली आमची फेसबुक मध्ये. नंतर आपणहूनच वाढत गेलेली चॅटिंग थोड्या दिवसापूर्वीच फोन नंबरची झालेली देवाणघेवाण. थोडेफार झालेली आपली-परकी बोलणी. तसे बघितले तर मला थोडे थोडे (तिलाही असू दे ही इच्छा) प्रेम जाणवू लागले होते... आणि आज तशी पहिलीच भेट.

“भैया थोडा जल्दी चलो. देर हो रही है” रिक्षावाल्यालाही आपली परिस्थिती कळू दिली.

का कोण जाणे थोडासा अवघडलोच होतो. मन अस्वस्थ झाले होते. ती कशी दिसते, काय बोलणे होईल अश्या प्रश्नांची भीती नव्हतीच. पण आपला भूतकाळ तिला कळल्यावर तिचा रिस्पॉंस काय असेल ह्या गोष्टीला मन घाबरत होतं. ’का’ ते कळत नव्हतं. खूप दिवसांनी कोणी मित्र झाले म्हणून? कोणी फक्त मलाच आपुलकीनं विचारतंय म्हणून? का मी खरंच तिच्या प्रेमात पडलोय म्हणून? निरुत्तरच आहे अजून. 'पाच-दहा मिनिटात स्टॉप येईल आत्ता' माझं पुटपुटणं चालूच.

ठरल्याप्रमाणे कॉफी सेन्टरवर ती वाट पाहत उभी होती. थोडंसं ओशाळून मी उशिरा आल्याची माफी मागितली खरी पण तिला भेटण्याचा आनंद मात्र लपवता येत नव्हता. थोडावेळ असेच आम्ही एकमेकांकडे बघत काय बोलावे किंवा कुणी पहिली सुरवात करावी याचीच आखणी करत राहिलो. आत्ता ऊन कडक झाले होते. अचूक मध्यान्ह असावी. या मौनाला शेवटी तिनेच पूर्णविराम दिला.

'त्या हॉटेल मध्ये कोल्डड्रिंक घेवूया का?'

आवाज मंजुळ होता. तसा फोनवर ऐकलेला पण आज जास्तच गोड वाटत होता. दिसण्यातही ठीकठाक होती. 'दिल आया गधी पर तो परी क्या चीज है' की ' Beggers are not choosers' यातली कोणती म्हण मला शोभेल असा अवचट विचार लगेच मनात चुकचुकलाही. पण आपल्या मानसिक परिसंवादाला अर्धवट ठेवून मी तिला होकार दिला 'हो चला'

'अहो जाहो काय करतोयस? फक्त मीनल म्हण. चालेल.'

'मलाही कबीर म्हणा म्हणजे म्हण' एकेरी-आदरी नावे पुकारण्याचा तोडगा तिने काढला असूनही आणि मला प्रसंगावधान काही सुचत नसल्याने मीही फुकट आगावू माझी संमती मिसळली.

हॉटेलमध्ये गेलो. वेटरनेही आमच्या कडे पाहून एक थोडेफार स्वतंत्र टेबल शोधून दिले. तिने लगेच दोन कोल्ड ड्रिंक मागवले आणि माझ्याकडे बघून स्मित हास्य करत डोळे मिचकावले तोपर्यंत मलाही थोडा धीर आला. इकडच्या तिकडच्या गप्पांना सुरुवात झाली. सुरुवात तशी एका नवं प्रेमात पडलेल्या आणि पहिल्यांदा भेटलेल्या युगुलासारखीच होती. 'खूप गरम होतंय नाही? मग मुंबईची गर्दी. लोकल ट्रेनचा ताप. मध्येच कोणाच्यातरी गावाशी केलेली तुलना. एकमेकाच्या पेहरावाची तारीफ. भावंडाची चौकशी. थोडं खोलात जाऊन आई वडील काय करतात. घरची थोडीफार अवस्था. असे भरपूर मुद्दे यशस्वीपणे पार पाडत मग खऱ्या संदर्भाची बोलणी सुरू झाली. (तोपर्यंत मी पावभाजी ऑर्डर केली होती)

'काय करतेस तू?'

'मी ग्रॅज्युएट आहे रसायनशास्त्रात. एका लॅबमध्ये आहे कामाला कांदिवलीला. तू काय करतो?'

'मी कारकून आहे बँकेत'

'ओह्ह मस्त'

मी सुखावलो.

'मग लग्नाविषयी काय मत तुमचे? कोणी भेटले की नाही अजून? - सरळ मुद्द्यात हात घातला. चुकलो की काय असा प्रतिप्रश्न ही मनात नाही आला. ( कमाल आहे !!)

'नाही अजून रे. कोणी मनासारखे नाही भेटले अजून. बघूया जमतात का तारा कुठे....' तिने खाली बघत, मग चोरट्या नजरेने माझ्यावर कटाक्ष टाकून लाजतच उत्तर दिले. (का लाजली हे वादाचा प्रश्न झाला!!! या दरम्यान तिला भाजी वाढताना आमचा दोघांचा हस्तस्पर्श नकळत झाला आणि मग जाणूनबुजून आम्ही तसाच राहू दिला हे दोघांसाठीही विशेष. आणि हात हातातच होते..!!)

'तू? तुला नाही भेटली कोणी?' आत्ता या भेटीतला खरा प्रश्न समोर आला. सरकारने आणीबाणी घोषित केल्यासारखा मी दचकलो. प्रश्न तर अपेक्षित होताच. पण खोटे बोलून वेळ मारून न्यायची माझी इच्छा नव्हती.आणि.......

'मीनल.. मी.... म्हणजे... (एक मोठा श्वास आणि नजर खाली झाली) “दोन वर्षापूर्वी माझे लग्न झाले होते... सर्व नीट होते.. चार जणांचेच कुटुंब.. आई वडील आणि आम्ही दोघे...मागच्या वर्षी एक मुलगाही झाला.... सगळे ठीक चालले होते.. पण तो फक्त माझा समज होता. रोज घरी तिची आई वडिलाबरोबर भांडणे... आदळ-आपट. त्रास वाढत गेला. रोज घरी जावून पहिले भांडण सोडवण्याचीच कामे.. एक दोनदा घर सोडून गेली.. खूप समजावले.. शेवटी वेगळे राहायला सुरवात केली. एका कारकून पगारात दोन घर चालवणे फार कठीण जायचं. पण काय करणार?.. एकीकडे आई बाप.. दुसरीकडे ही.. परत सर्व थोडे दिवस पूर्ववत झाले.. पण हाही माझा समज होता.. आई बाबांनी बोलणे फार कमी केले.. पैशाची चणचण दोन्हीकडे जाणवू लागली.. दोन्ही कुटुंबांमधून एकालाच निवडण्यापर्यंत मजल गेली.. परत भांडणे.... अंती: सर्व विकोपाला गेले.. ती निघून गेली.. समजावणे अपुरे पडले.. प्रेम करत नाही हे कारण झाले आणि घटस्फोटाच्या कागदावर सह्या झाल्या.. आई बाबा अधून मधून येतात...

मीच त्यांना घरातून काढल्याचा राग अजून त्याच्या मनात आहे.. थोडेफार बोलतात... आणि जातात... रोज नवा दिवस यायचा अन मी अजून सर्वांची वाट पाहत राहिलो.. असंच आहे काहीतरी माझं आयुष्य....'

पण.... (उरल सुरले ही सांगून टाकावं असे ठरवले मी) मग थोड्या दिवसांनी तू आयुष्यात आली... आवडायला लागलीस.. आणि खर सांगू प्रेमात पडलोय मी तुझ्या... एकटेपणा अचानक दूर झाल्यासारखा वाटतोय....लग्न...!!!......'

जीभ चावून मी आवरते घेतले. आवेशात किती हवे-नको बोलून गेलो ते मला कळलेच नाही. मघापासून होणारा आमचा बोटांचा लपंडाव तिने थांबवला. क्षणात परके झाल्यासारखे वाटू लागले. तिच्याकडे उत्तराची अपेक्षा हृदय करू लागले होते.

'बोल ना काहीतरी' - मी

'अं.. हो.. वाईट वाटले मला ऐकून. आणि स्पष्टच सांगायचं म्हणजे मलाही तू थोडाफार आवडायला लागला होतास. पण लग्न वगैरे या गोष्टी मी अजून ठरवल्या नाहीयेत. सॉरी.. पण आपण चांगले मित्र आयुष्यभर राहण्याचा प्रयत्न करूच की...'

पुढचे मला ऐकू आलाच नाही. मन हरवून गेले. तिने या वाक्यात उत्तर सांगितले होते.. किबहुना फक्त एका शब्दातच.. "आयुष्यभर" ती फक्त मैत्रीच होती.. छोटीशी.. दया जमा करणारी..

दुपारचे अडीच वाजले होते. तिचीही पुढे जास्त बोलण्याची आशा मावळली होती आणि आणि माझे तर मन पुन्हा कोमेजून गेले होते. औपचारिकपणे एकमेकाचा निरोप घेऊन आम्ही आपापल्या वाटेवर निघालो...

खूप वाईट वाटत होते. अचानक विरहाची गाणी मनात चूळबुळ करायला लागली होती. डोळयातून अश्रू न सांगता पडायला सुरवात झाली होती. रिक्षातून सारखी नजर आकाशाकडे

जात होती. ती देवालाच शोधत होती- त्याला जाब विचारण्यासाठी तरसत होती. मी काय केलंय असं? का माझंच जीवन असे? मला प्रेम भेटण्याचा किंवा प्रेम करण्याचा हक्क का नाही? मला माझे विचार, माझे मत, माझेच जीवन माझ्या आपल्या बरोबर जगण्याचा परवाना का नाही? आयुष्यभर बँकेत लोकाच्या जमाखर्चाचा हिशेब करणारा मी स्वत:साठी - स्वत:च्या जीवनाविषयी सोडवणाऱ्या एक छोटाश्या आकडे मोडीत कसा नापास झालो? - खूप काही विचारायचं राहून गेले... आयुष्यभर एकटे जरी राहावे लागले तरी कमी दु:ख होईल जेव्हा निदान एक असा व्यक्ती तरी बरोबर असतो की ज्याला आपण प्रश्न तरी विचारू शकतो मग उत्तर भेटले नाही तरी चालते. तर तेही नाही...

पूर्ण आजूबाजूचे वातावरण एका क्षणात बदलल्या सारखे वाटत होते. स्वत:वरच राग येत होता.. माझी मोपेड ठेवलेले गैरेज जवळ येत होते..

पण खरं सांगू का?..

खरं तर काही बदलले नव्हते..!!!!! सर्व तेच होते..

मुंबईची एक साधी-रोजसारखी दुपार.... सगळे जण आपापल्या दैनंदिनीत मग्न... परक्यासारखे... तोच गजबजाट.. गोंधळ.. गर्दी.... असंच काहीतरी..

आणि वर आभाळातून मात्र 'अरुण' देव आग ओकत - आपल्या सामर्थ्याची जाग देत रोजप्रमाणे खाली बघून हसत सगळी गंमत पाहत होता..

आणि मुख्य म्हणजे ते न विसरण्यासारखे वाक्य!!!!

"सेकण्ड हॅन्ड गाडी का क्या भरोसा है साहब, पता नही कब धोका दे दे"

पटले....

**-तनवीर सिद्दिकी.**

siddiqui.tanveer9@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

कसा वाटला इत्यर्थ मासिकाचा हा अंक? आवडला? खुप आवडला? अगदी प्रचंड आवडला? कोणाचं लिखाण आवडलं ? तुम्ही आम्हाला सांगितलं तरच आम्हाला कळेल ना! तुमच्या मनोरंजनासाठी एवढं पानंच्यापानं लिहिणाऱ्या त्या लेखिकेला किंवा लेखकाला तुम्ही काही ना काही कळवलंच नाहीत तर ते पुढचं पुस्तक कसं काय लिहीणार? एक ई मेल तर पाठवायची. किंवा एक फोन.

इंटरनेटमुळे कधी नाही इतकं जग जवळ आलं. अत्यंत कमी खर्चात ई पुस्तकं बनवता येऊ लागली आणि लाखो वाचकांपर्यंत वितरण करणं शक्य झालं. त्यामुळे नवनवीन लेखकांसाठी एक व्यासपीठ उभं झालं. त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे वाचकांना प्रतिक्रिया देणंही सोपं झालं.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. ही कडधान्यं जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा म्हणतात की या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते. पण हा दाणा आपण उसळीत घालून खाल्ला की मात्र संपून जातो.

मानवी प्रतिभाही अशीच असते. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. कधी कधी त्यांना योग्यवेळी माती, खत, पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. खत-पाणी म्हणजे वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रं, मतं, शाबासकी, दाद.

दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना पुस्तकं मिळत नाहीत. परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही. मग ते तेच ते जुने लेखक वाचत रहातात. अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे, मावळे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींचे एक सुंदर व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्गट भारी” द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची  उभारी दिली. “जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी” ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या, कॉमिक्स, गूढकथा, प्रवासवर्णनं, आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाख रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत

मर्यादित  का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य  पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल. होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?

आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com                www.ednyaneshwari.com                www.marathiriyasat.com

www.esahity.com

9869674820